# जिजामाता कृषिभूषण २००९

## श्रीमती  पुजा पांडुरंग सावंत

### मु.पो. टाकळी सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर



- ऊसाच्या पाचटापासून सेंद्रिय पध्दतीने गहू, हरभरा, मका, लसूण, उडीद व कांदा इ. पिकांचे भरीव उत्पादन.
- शेतबांधावर वनवृक्षे व नारळाची लागवड करुन अश्वगंधा, तुळस, अर्जून, गुंज, रिठा, निरगुडी, सर्पगंधा, कडूलिंब व चंदन इ. वनस्पतीचे संवर्धन
- बहूपिक फळ पध्दतीने केलेली कोकण लिंबाची बाग हे सोलापूर जिल्हयाचे वैशिष्ठय ठरले आहे.
- पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय सुरु करुन महिला बचत गटांनाही सततचे मार्गदर्शन करणे.
- शेतीविषयक अभ्यासाकरिता ऑस्ट्रेलिया, न्यझीलंड, फ्रान्स, हॉलंड, इंग्नड व जर्मनी इ. देशाचा विदेश दौरा.
- कृषीमालावर आधारित लोणचे, जाम, जेली, सरबत, इत्यादी गृह उद्योग.

# जिजामाता कृषिभूषण २००९

## श्रीमती विमल हिंदूराव पाटील

### मु.पो. कामेरी, ता. वाळवा, जि. सांगली



- एकूण जमीनधारणा ३.२८ हे. असून त्यामध्ये आंबा, नारळ व सागवान याची लागवड केली तसेच सोयाबीन, गहू, हरभरा व ऊस इ. पिके घेतात.
- पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, इमूपालन हे व्यवसाय सांभाळून गावातील पतसंस्थेचे चेअरमन पद सात वर्षे भूषविले.
- ग्राम बिजोत्पादन कार्यक्रमात सलग ३ वर्षे सहभाग घेतला
- कृषि विज्ञान मंडळामार्फत महिलाच्या शेतीशाळा आयोजित करुन बचत गटाची स्थापना केली.
- महिलासांठी चर्चासत्र, कृषि प्रदर्शने व महिलांना एकत्रित करुन त्यांना शेतीविषयक मार्गदर्शन मिळण्याकरिता पुढाकार घेतात.

# जिजामाता कृषिभूषण २००९

## कु. सुनंदा संतोषराव सालोटकर

### मु.पो. सोनेगाव, ता. कळमेश्वर, जि. नागपूर



- एकूण २.२६ हे. जमीनधारणा असून त्यामध्ये संत्रा, चिकू, आंबा, बांबू, सिताफळ, सागवान, आवळा, बेल इ. पिकांची लागवड.
- संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांनी स्वत: स्विकारली असून धाकटया बहिणींच्या सहाय्याने शेतीची जबाबदारी समर्थपणे पेलली.
- शेतीची सर्व कामे स्वत: करुन शेतीस पूरक व्यवसाय म्हणून तुतीचे व रेशमाचे उत्पादन.
- भाजीपाल्याचे मुख्य उत्पादन असून प्रामुख्याने कोबी पिकाचे उत्पादन.

# जिजामाता कृषिभूषण २००९

## श्रीमती सुनंदा राजेंद्र पवार

## मु. पो. पिंपळी, ता. बारामती, जि. पुणे



- प्रगतीशिल महिला शेतकरी असून पुण्यात दरवर्षी भरविण्यात येणा□या भिमथडी जत्रा या प्रदर्शनाच्या आयोजिका.
- शहरी लोकांना ग्रामीण भागाची माहिती व्हावी म्हणून ॲग्रीकल्चर डेव्हलपमेन्ट ट्रस्टच्या माध्यमातून ॲग्रो टुरीझमची उभारणी करुन संस्थेच्या ११० एकर क्षेत्रावर विविध फळबागा, रेशीम उद्योग, तुती लागवड, फळप्रक्रिया केंद्र, बियाणे प्रक्रिया व प्रमाणीकरण व औषधी सुगंधी वनस्पतीची लागवड या संबंधीची माहिती व मार्गदर्शन करणे.
- पाण्याचे महत्व व पाण्याची बचत याबाबत लोकगीते, पथनाटयाद्वारे प्रबोधन करुन लोकजागृती.
- महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण करण्याचे उद्देशाने त्यांचेसाठी स्वयंसहायता बचत गटाची स्थापना करुन आतापावेतो १३८० बचत गटाची स्थापना.
- सन २००९ चे भिमथडी जत्रेस जवळपास ४ लाख ग्राहकांनी भेट दिली होती व त्याद्वारे महिला बचत गटाच्या उत्पादनाची विक्रमी विक्री होवून बचतगटांना रु. ३ कोटी उत्पन्न मिळवून दिले.

# जिजामाता कृषिभूषण २००९

## श्रीमती विमल बालाजी कदम

### मु.पो. गणपूर, ता. अर्धापूर, जि. नांदेड



- एकूण प्रक्षेत्रावरील १० एकर क्षेत्रावर चिकू, ९ एकर केशर आंबा, ३ एकर नारळ, २ एकर क्षेत्रावर लिंबू या फळपिकाची लागवड.
- माती व पाणी परिक्षणानुसार विविध खताचा वापर करुन एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन.
- चिकू पिकाचे वार्षिक उत्पादन ५० टन असून त्यामधून त्यांना रु. ६.०० लाख उत्पादन मिळते.
- परिसरातील आयोजित शेतकरी मेळावे, प्रशिक्षण व चर्चासत्रामध्ये हिरीरीने सहभाग.
- सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सक्रीय सहभाग घेवून परिसरातील महिलांसाठी विविध विषयावरील जागृती व प्रबोधनाकरिता शिबीराचे आयोजन.